# प्रकाशाची अक्षरे

प्रवीण दवणे

रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**प्रकाशाची अक्षरे**
प्रवीण दवणे

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
प्रवीण दवणे
ब-३०३, 'राजहंस' लुईसवाडी
पारसिक बँकेसमोर, ठाणे (प.), ४००६०४
फोन नं. ०२२-२५८२३३३१ मो. नं. : ९८२०३८९४१४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

कृतीनेच शब्द उच्चारणाऱ्या,
वनवासी, आदिवासी मुलांसाठी
प्रकाशाचे अक्षर होणाऱ्या,
शिक्षणमहर्षि दादासाहेब लिमये
यांच्या सेवाव्रती जीवनाला कृतज्ञतापूर्वक...

# *अक्षरे उजळताना*

नमस्कार!

वृत्तपत्राच्या माध्यमातून आपण वाचकांच्या थेट घरातच पोहोचतो आणि सदर लेखनानिमित्ताने पडणारे आपले पाऊल विश्वासार्ह वाटले, तर वाचक आपल्या हृदयातच स्थान देतात, याचा अनुभव मी अनेकदा घेतला आहे. केवळ करमणूक न करता माहितीप्रधान व वैचारिक स्वरूपाचा मजकूर देऊन समाजाला विचारसमृद्ध करण्याचे महत्त्वाचे कार्य वृत्तपत्रे करीत असतात. विषयांमध्ये विविधता असल्यामुळे, वाचक आपल्या आवडीची सदरे नियमाने वाचतात, असा अनुभव अनेक सदरांनी मला लेखक म्हणून दिला. 'सामना' दैनिकातील 'प्रकाशाची अक्षरे' या सदराने मला समाजाच्या अनेक स्तरांतील वाचक मिळवून दिले. आसपास दडलेल्या, 'आपल्यात' ही दडलेल्या अनेक विचारकणांना, विषयांना साद घालण्याची संधी सातत्याने सदर लिहिणाऱ्यांना मिळते. लेखणीला अनेक प्रकारे हाताळता येते का हे आजमावण्याचीही संधी मिळते. लेखनाच्या सर्व शक्यता चाचपून पाहायचा ध्यास गेली अनेक वर्षे मी घेतला आहे.

एका पुस्तकाच्या प्रतीमागे अनेकांचे परिश्रम असतात. कित्येक कात्रणे सापडली नाहीत. ती मिळवून ग्रंथासाठी संकलन करण्याच्या कामात माझे विद्यार्थी मित्र प्रकाश दिनकर, दिनेश नलावडे यांची बहुमोल मदत झाली, या गोष्टीचा आवर्जून उल्लेख मी करीत आहे. लेखसंकलनास अनुमती देणाऱ्या 'सामना' संपादकांचेही आभार!

– ऋण व्यक्त करण्याच्या या प्रवासात मन नतमस्तक होते ते डॉ य. दि. फडके यांच्यापाशी! वाचत राहावे असे प्रसन्न, वैचारिक, संशोधनपर लिहिणारे डॉ. फडके हे माझे आवडते विचारवंत साहित्यिक. एका भेटीत त्यांनीच सुचविले, 'सामना'चे लेख पुस्तकरूपात का नाही आणत?' मी तत्परतेने म्हटले, 'आणतो, पण प्रस्तावना द्याल?'

आपलं सहज सांगणं असं अंगाशी येईल असं डॉ. फडके सरांना वाटलं नसेल. ते प्रेमाने म्हणाले, 'जरूर!' वेळ नसण्यासाठीच त्यांच्याकडे वेळ येतो, अशा कार्यव्यग्रतेतून त्यांनी माझ्यासाठी चार शब्द दिले. ही गोष्ट आजन्म कृतज्ञ राहावं अशीच आहे. ही 'प्रकाशाची अक्षरे' आता अधिक व्यापक व सुबक स्वरूपात सादर करणाऱ्या रिया पब्लिकेशन्स्चे शितल मेहता यांचे हार्दिक आभार!

वाचक मित्रांनो, केवळ संकेत म्हणून नाही, मी खरंच आपल्यावर मनापासून प्रेम करतो. जगण्यापेक्षा 'जिवंत' राहण्याच्याच आजच्या भयानक गुंतागुंतीच्या काळातही तुम्ही जमेल तितकं वाचून हा वाचक-लेखक संवाद प्रवाही ठेवता. खूपच भिडलं, तर पत्रानेही कळवता. केवळ वाचक असं स्वरूप न राहता अनेकदा भेटता, प्रत्यक्ष मित्रही होता. माझं हे दृश्य-अदृश्य नातेवाईकांचं कुटुंब दिवसेंदिवस वाढतच आहे. हेही पुस्तक कसं वाटतंय हे कृपया मनमोकळेपणाने कळवा.

माझ्या लेखणीवर गुरुकृपेचं चांदणं जसं बरसावं, तशी आपल्या स्नेहाची कवचकुंडलं कायम लाभावीत ही प्रार्थना!

**– प्रवीण दवणे**

✦✦✦

## प्रस्तावना

गेल्या पंचवीस-तीस वर्षांत अनेक वाङ्मयीन नियतकालिके-विशेषत: मासिके-बंद पडली. दैनिकांच्या रविवारच्या पुरवण्यांमध्ये सातत्याने ललित लेखन प्रसिद्ध होत असल्यामुळे मासिकांची उणीव काही प्रमाणात का होईना भरून निघाली आहे. पत्रकारिता हा ज्यांचा व्यवसाय नाही असे ललित लेखकही हौसेने अलीकडे स्तंभलेखन करताना आढळतात. त्यामध्ये प्रवीण दवणे यांच्यासारखे कवीही आहेत. 'सामना' या बलदंड व उग्र प्रकृतीच्या दैनिकाच्या रविवारच्या पुरवणीत मनाचा कोवळेपणा आणि वृत्तीचा हळवेपणा जपणारे लेखनही प्रसिद्ध होत असते. १९९४ मध्ये 'सामना'च्या रविवार पुरवणीत 'प्रकाशाची अक्षरे' या सदरात प्रसिद्ध होणारे प्रवीण दवणे यांचे लेख या प्रकारचे होते. ते आता पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहेत, ही आनंददायी घटना आहे.

वृत्तपत्रातील स्तंभलेखनाच्या काही स्वाभाविक मर्यादा असतात. दैनिकात किंवा साप्ताहिकात उपलब्ध असलेल्या छोट्याशा आटोपशीर जागेत शब्दांची काटकसर करीत आपला संसार थाटावा लागतो. ललित लेखांच्या सदराला अमूर्त संकल्पना, फार गंभीर विषय तसेच जडजंबाल भाषा यांचे वावडे असते. ललित लेखकाला चिंतन वर्ज्य असते, असा मात्र त्याचा अर्थ नाही. रोजच्या चाकोरीच्या जीवनातही कधीतरी एखादा अविस्मरणीय अनुभव येतो. सुखदु:खाचे क्षण वाट्याला येतात, मुलखावेगळी माणसे भेटतात. त्यांनी उच्चारलेले एखाद् दुसरे वाक्य विसरू म्हटले तरी विसरता येत नाही. वाचकांना विश्वासात घेऊन त्यांच्याशी हितगुज करावेसे ललित लेखकाला वाटू लागते.

'प्रकाशाची अक्षरे' हे सदर चालवताना प्रवीण दवणे यांनाही आपल्याला आवडलेली वाक्ये उद्धृत करून त्यांच्याभोवती रुंजी घालण्याचा मोह आवरता आलेला नाही. भावगीत गायक गजाननराव वाटवे यांच्या गौरवसमारंभात संगीत-

दिग्दर्शक यशवंत देव म्हणाले, ''सूर लावून अनेकजण गातात, वाटवे जीव लावून गातात.'' तो त्यांचा अभिप्राय प्रवीण दवणे यांना इतका आवडला की, गाणे म्हणजे केवळ कविता वा चाल अगर गायकाचा स्वर नाही तर 'जीव' ओतणे असे त्यांनी त्या अभिप्रायाचे अर्थ उकलून दाखवले. आपल्या परीने पाण्याच्या हौदात दुधाचा तांब्या मिसळायचा, सर्व हौद दुधाने भरणार नाही कदाचित, पण पाणी तर दुधी रंगाचे होईल, हे आचार्य दादा धर्माधिकारींचे उद्गार प्रवीण दवणे यांच्या मनात खोलवर रुतलेले दिसतात.

'प्रकाशाची अक्षरे' या सदरात प्रवीण दवणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही कवडसे पडलेले दिसतात. त्यांचा पेशा प्राध्यापकाचा. नाना प्रकारचे विद्यार्थी त्यांना पाहावयास मिळालेले आहेत. त्यांचे ओझरते दर्शन सदरातील ललित लेखांत घडले नसते तरच नवल वाटले असते. शिक्षकाच्या अनुभवविश्वात त्याच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा वाटा मोठा असणे अपरिहार्य असते. प्रवीण दवणे हे पुस्तकांच्या दुनियेत रमतात. बघण्यापेक्षा ग्रंथ वाचण्याने मिळणारा आनंद त्यांना महत्त्वाचा वाटतो. ग्रंथालय म्हणजे त्यांच्या दृष्टीने एक बहरलेली हिरवीकंच डहाळी.

ग्रंथांच्या विश्वात रमणारे प्रवीण दवणे यांना माणसांचा सहवासही आवडतो. आपल्या अवतीभोवतीच्या माणसांचे अनेक नमुने त्यांनी या लेखात पेश केलेले आहेत. गरुडझेप घेण्याची धमक असलेल्या एका मित्राच्या मनात सूड घेण्याची इच्छा वर्षानुवर्षे खदखदत राहिल्यामुळे त्याचे केविलवाणे झुरळ झाल्याचे त्यांना दिसले. आजारी मनाची माणसे सतत आपल्या वेदना आणि जखमा कुरवाळत राहून इतरांचे आयुष्यही कसे दूषित करतात हेही त्यांनी दाखवले आहे. आपल्या वाट्याला येणारे दु:ख, अपमान किंवा हालअपेष्टा मनात ठेवाव्यात; त्या उगाळीत बसू नयेत, मात्र आपल्याला मिळालेला आनंद मोकळेपणाने वाटावा म्हणजे तो वाढतो, अशी प्रवीण दवणे यांची धारणा आहे.

'या माझ्या पंखांनी उडण्याचे वेड दिले, पण माझ्या हातांनी घरटे हे निर्मियले-' असे म्हणणाऱ्या मंगेश पाडगावकरांनी घरट्यातून आणि गगनातून शापित माणसासारखे तगमगणाऱ्या माणसाचे त्यांच्या एका कवितेत चित्रण केले आहे. प्रवीण दवणे यांना एखाद्या कुटुंबवत्सल माणसासारखी आपल्या घरट्याची,

घराची ओढ आहे. मातापित्यांच्या मायेची पाखर त्यांना घरात हवी असल्यामुळे जन्मदात्या माता-पित्यांची वाटणी करणारे भाऊ त्यांना सर्वांत मोठे गुन्हेगार वाटतात. आजी-आजोबांसह रमलेली नातवंडे त्या मुलाला, सुनेला बघायला मिळतात, ती घरे म्हणजे पृथ्वीवरील स्वर्ग असे त्यांना वाटते. लग्न झाल्यानंतर वेगळे राहण्याऐवजी आई-वडिलांसह राहणाऱ्या लेखकाला 'अजून आई-वडील तुमच्याकडेच राहतात का?' असा खवचट प्रश्न विचारणाऱ्याला, 'नाही, मीच त्यांच्याकडे राहतो,' असे उत्तर देऊन लेखकाने गप्प बसवले ते त्यामुळेच.

'तसंच भेटता येईल का पुन्हा?' या लेखामागे त्यांचे कविमन दडलेले आहे हे सहज जाणवते. म्हटले तर गूढ, म्हटले तर गूढ नाही अशा अनुभवांबद्दलचा त्यांचा लेखही अन्य लेखांपेक्षा वेगळा आहे. या विविधतेमुळेच त्यांच्या ललित लेखांचा हा संग्रह वाचनीय बनला आहे.

**– य. दि. फडके**

✦✦✦